**<u>दि.दा.क्र.४४/२००९</u>** **<u>नि.क्र.६७</u>**
**<u>सुभाष वगैरे वि. निशाद वगैरे</u>**

**<u>निशाणी क्र. १४५ वरील आदेशानुसार उलटतपास शपथेवर आज दिनांक २०.०२.२०१८ रोजी पुढे सुरु – प्रतिवादी क्र. १ ते ४ तर्फे ॲड. श्री सी.एस. लहाबार</u>**

शपथपत्रावरील माझे नाव सुभाष उर्फ शित्रुक वल्द नागोराव डोंगरे हे माझे स्वत:चे नाव मी स्वत: लिहले आहे. माझी जन्म तारीख दिनांक २३.०९.१९५५ आहे. माझे शिक्षण बि. कॉम र्प्यंत झाले आहे. मी नागपूर विद्यापिठातील पी.डबलु.एस. कॉलेजमधुन बि.कॉम उत्तीर्ण झालो.

***प्रश्न :–*** *वंशावळीत नमूद केल्याप्रमाणे उरकुडी हि नागोची दुसरी कि तिसरी पत्नी होती ?*
***उत्तर :–*** *उरकुडी हि नागोची पहिली पत्नी होती.*

मांगो हा नागोचा सख्खा भाउ होता. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यामध्ये नमूद असलेली सर्व वाद मालमत्ता नागोला आपसी वाटणी हिस्यामध्ये प्राप्त झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, अर्धी मालमत्ता नागोला व उरलेली अर्धी मालमत्ता मांगोला देण्यात आली होती. नागो आणि मांगो यांच्यामधील वाटणी लक्ष्मण डोंगरे यांच्या मृत्यूपुर्वी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, नागो याचा मृत्यू दिनांक २०.०९.१९५७ रोजी झाला. हे म्हणणे खरे नाही की, नागोच्या मृत्यूनंतर त्याच्या नावे असलेली सर्व मालमत्ता त्याच्या वारसानाच्या नावे नमूद झाली. साक्षदार आता सांगतो की, नागोच्या नावे असलेली सर्व मालमत्ता त्याच्या वारसानाच्या नावे नमूद झाली. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यामध्ये नमूद असलेली मालमत्ता हि नागोच्या नावे असलेल्या मालमत्तेमध्ये नमूद होती.

मुक्ताचे लग्न कोणासोबत झाले होते हे मला माहित नाही. रतिराम घरडेच्या पत्नीचे नाव मला माहित नाही. निशाणी क्र. ९१ वरील दस्ताऐवज मी दाखल केले. हे प्रमाणपत्र मी हिरकणी रतिराम घरडेच्या नावे शाळेतुन प्राप्त केले. हिरकणी हि रतिरामची मुलगी आहे. हे प्रमाणपत्र प्राप्त करण्याच्या एक वर्षाआधी हिरकरणी हि रतिरामची मुलगी असल्याची शहानिशा केली होती. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ९१ वरील प्रमाणपत्र प्राप्त करण्यापुर्वी रतिराम घरडे यांच्या पत्नी बद्दल किंवा तिच्या नावाबद्दल मी शहानिशा किंवा पडताळणी केली नव्हती. मी एल.आय.सी.मध्ये विकास अधिकारी या पदावर कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, एल.आय.सी मध्ये कोणत्याही व्यक्तीचा विमा उतरवितांना त्या

व्यक्तीच्या कुटूंबातील सर्व सदस्याची माहिती एल.आय.सीव्दारे घेण्यात येते. साधारणत:एखादया मुलाचे किंवा मुलीच्या आईवडिलाच्या नावाची पडताळणी केली जाते. हिरकणी हि रतिराम घरडेची मुलगी आहे हे सिध्द करण्यासाठी मी निशाणी क्र. ९१ वरील दस्ताऐवज प्राप्त केले. हिरकणीचे नाव वाद मालमत्तेमध्ये नमूद असल्यामुळे हे दस्ताऐवज प्राप्त करावे लागले. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. ९१ वरील दस्ताऐवजामध्ये मी जाणीवपुर्वक सबंधीत दस्ताऐवज देणा-याला हिरकणीच्या आईचे नाव त्या दस्ताऐवजामध्ये नमूद करु दिले नाही. हिरकणीची जन्म तारीख मला माहित नाही. हिरकणीचे शिक्षण किती हे मला माहित नाही. हिरकणी कोणत्या शाळेत शिकली हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. ९१ वरील दस्ताऐवज मी खोटे तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, हिरकणीविरुध्द दावा करायचा होता म्हणून मी खोटे दस्ताऐवज तयार केले.

हे म्हणणे खरे नाही की, नागोच्या पहिल्या पत्नीचे नाव यमुनाबाई होते. हे म्हणणे खरे नाही की, नागो आणि यमुना यांना मुक्ताबाई उर्फ मुक्ती नावाची मुलगी झाली होती. हे मला माहिती नाही की, मुक्ताबाई वल्द नागो डोंगरे हिचे लग्न रतिराम घरडेसोबत झाले होते. हे मला माहित नाही की, मुक्ताबाईच्या पतीचे नाव रतिराम घरडे आहे.

***प्रश्न :-*** *मुक्ताबाई आणि रतिराम यांच्या मुलीचे नाव हिरकणी आहे, याबद्दल तुम्हाला काय सांगायचे आहे ?*

***उत्तर :-*** *रतिरामच्या मुलीचे नाव हिरकणी आहे.*

हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ४ हे हिरकणीचे मुले आहेत. हिरकणी हि केशव चव्हान यांची पत्नी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मुक्ताबाई हि नागोची मुलगी असल्याची बाब मी जाणीवपुर्वक माझया या दाव्यामध्ये नमूद केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, यमुनाबाई हि नागोची पहिली पत्नी असल्याची बाबसुध्दा मी या दाव्यात जाणीवपुर्वक नमूद केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यामध्ये नमूद केलेली वंशावळ चुकीची व खोटी आहे. हिरकणी व केशव यांच्या लग्नाच्या वेळी माझे वय किती होते हे मला माहित नाही. हिरकणी माझेपेक्षा वयाने मोठी आहे. ती किती वर्षाने मोठी आहे हे मला माहित नाही. केशव चव्हान कोणत्या विभागात नोकरी करायचे हे मला माहित नाही. हे मला माहित नाही की, केशव चव्हान हे नागपूर येथे पोष्ट ऑफिसमध्ये नोकरी करीत होते. केशव चव्हान यांचा मृत्यू कसा झाला हे मला माहित नाही. हे मला माहित नाही की, केशव चव्हान यांचा मृत्यू त्यांचे घर जळाले तेंव्हा झाला. हे म्हणणे खरे नाही की, माझे बि.कॉमचे शिक्षण हिरकणी आणि केशव यांच्या घरी झाले.

हे म्हणणे खरे नाही की, दाव्यामध्ये नमूद असलेली शेतजमीन माझे कब्जामध्ये नाही. माझे लहानपणापासून हे वादशेत माझे कब्जात आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादजागेचा महसूल मी आई वडिल वारले तेंव्हापासून दिला नाही. मी शेत सा-याची किती रक्कम किती दिली हे मला सांगता येणार नाही. माझे वडिलांचा मृत्यूच्या वेळी मी एक ते दिड वर्षाचा होतो आणि आईच्या मृत्यूच्या वेळी अंदाजे सात वर्षाचा होतो. साक्षदार सांगतो की, मांगोने बालपणी माझे शिक्षण व इतर खर्च केला. वयाच्या १८ वर्षानंतर मी मांगोकडून वादशेतीची सुत्रे सांभाळली. हे म्हणणे खरे आहे की, मी वयाच्या १८ वर्षापासून वादजागेचा शेतसारा देत आहो आणि वादजागेचे दस्ताऐवज अद्यावत ठेवत आहो. हे म्हणणे खरे आहे की, वयाच्या १८ वर्षापासून मी वादजागेवर कोणत्या वारसानाची नावे लागली याची शहानिशा केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वादातील जमीनीवर हिरकणीचे नाव केंव्हा नमूद करण्यात आले याची मी शहानिशा केली नाही. मी वयाच्या २१ किंवा २२ व्या वर्षी हिरकणीच्या नावाबद्दल शहानिशा केली होती. हे म्हणणे खरे नाही की, हिरकणीच्या नावाच्या फेरफाराला मी हरकत घेतली नव्हती. या हरकतीसंबंधाचे दस्ताऐवज मी या दाव्यात दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वयाच्या २२ व्या वर्षापासून ते आजपर्यंत मी हिरकणीचे नाव वादजागेतुन कमी करण्याबद्दल कोणतेही महसूल अपिल दाखल केली नाही. साक्षदार सांगतो की, त्याने नायब तहसिलदार, रामटेक यांचेकडे अपिल केली होती. नायब तहसिलदाराने त्या अपिलमध्ये आदेश पारित केला नव्हता. साक्षदार सांगातो की, रेव्हेन्यू रेकॉर्डला हे दस्ताऐवज उपलब्ध नसल्यामुळे त्याने या दाव्यामध्ये हे दस्ताऐवज दाखल केले नाही. वयाच्या २३ किंवा २४ व्या वर्षी मी हि अपिल दाखल केली होती. आज माझे वय ६३ वर्षे आहे.

मला इंग्रजी लिहता वाचता येते. या दाव्यातील प्रार्थना क्र. VIII आता मला वाचुन दाखविला. साक्षदार स्वत: सांगतो की या दाव्यातील प्रार्थना क्र. VIII मधील मजकूर चुकीचा आहे.

हे म्हणणे खरे नाही की, हिरकणी हि नागो वल्द लक्ष्मण डोंगरे यांची वारस आहे. हे म्हणणे खरे नाही की, हिरकणी हि मुक्ताबाईची मुलगी असल्यामुळे तिला वादजागेत हिस्सा मागण्याचा अधिकार आहे. मला हि कल्पना नाही की, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी सन २००९ मध्ये वादातील जमीनीचे मोजमाप केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या मोजणीच्या वेळी मी सुध्दा हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दाव्यातील

मालमत्तेच्या वाटणीसाठी दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यामध्ये नायब तहसिलदार, रामटेक यांनी दिनांक २०.०६.२००९ रोजी आदेश दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या आदेशानुसार नायब तहसिलदारांनी प्रतिवादी क्र. १ ते ४ चा वादजागेतील सारखा हिस्सा मंजूर केला होता. हे म्हणणे खरे आहे की, या आदेशाविरुध्द मी एस.डी.ओ. कडे अपिल केली होती व एस.डी.ओंनी ती अपिल मान्य करुन नायब तहसिलदार यांचा आदेश रद्द ठरविला होता. हे म्हणणे खरे आहे की, एस.डि.ओंनी पारित केलेल्या या आदेशाविरुध्द प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या समक्ष अपिल दाखल केली आहे.

न्यायालयाची वेळ संपल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

(सुजीतकुमार चं. तायडे)
दवाणी न्यायाधिश क.स्तर
रामटेक.
दिनांक : २०/०२/२०१८

(सुजीतकुमार चं. तायडे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
रामटेक

**उलटतपास आज दिनांक ०८.०३.२०१८ रोजी शपथेवर पुढे सुरु – प्रतिवादी क्र. १ ते ४ तर्फे ॲड. श्री सी.एस. लहाबार**

साक्षदाराला न्यायालयीन अभिलेखावर नि.क्र.७२/१ वरिल दस्ताऐवजाच्या यादीनुसार दाखल कलेल्या महसून आदेशाची प्रत प्रदर्शीत करण्यात आली. साक्षदार सांगातो की सदर आदेश दिनांक ३०.०४.२०११ रोजी पारित करण्यात आला होता. या आदेशाच्या प्रमाणीत प्रतीला नि.क्र. १४९ देण्यात येतो. हे म्हणणे खरे आहे की, या आदेशाविरुध्द जिल्हाधिकारी नागपूर यांच्या समक्ष अपिल दाखल करण्यात आली आहे.

हे म्हणणे खरे आहे की, तहसिलदार रामटेक यांनी सन २००९ मध्ये पार्टीशनसंबंधी पारित केलेल्या आदेशाच्या वेळी या न्यायालयात पार्टीशनची केस प्रलंबित नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मौजा कडबीखेडा व देवलापार येथील वाद जमीनीच्या महसूल रेकॉर्डवर हिरकणीचे नाव दर्ज होते. देवलापार येथील सर्व्हे क्र. २२, २३,३८, ५१,५८ व ६५ तसेच कडबीखेडा येथील सव्हे क्र. १२२, १२३, १२४, १३३ व १३६ या जमीनीच्या महसूल रेकॉर्डवर हिरकणीचे नाव दर्ज होते. हे म्हणणे खरे नाही की, हिकरणीच्या या नावाबद्दल मी कोणतीही कायदेशीर कारवाही केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, हिरकणी जिवंत असेपर्यंत तिचे नाव या जमीनीच्या महसूल रेकॉर्डवरुन खारिज करण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, हिरकणी मरण पावल्यानंतर प्रतिवादी क्र. १

ते ४ ची नावे या महसूल रेकॉर्डवर दर्ज करण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, वादजमीन आणि वर उल्लेखीत शेतजमीनीच्या महसूल रेकॉर्डवर प्रतिवादी क्र. १ ते ४ ची नावे आजही आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा सारखा हिस्सा वादजमीनीवर असल्यामुळे त्यांची नावे खारिज करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, हिरकणी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या वादजमीनीच्या अभिलेखावरील फेरफारासंबंधीची माहिती महसूल अधिका-यांनी मला दिली होती. परंतू ती माहिती मी जाणीवपुर्वक न्यायालयापासून लपवून ठेवली. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना वादजमीनीच्या हिस्यापासून वंचित करण्यासाठी खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली.

**पुन्हा फेरतपास – काही नाही**

श्रवणोत्तर स्वीकृत                                        समक्ष

(सुजीतकुमार चं. तायडे)
दवाणी न्यायाधिश क.स्तर
रामटेक.
दिनांक : ०८/०३/२०१८

(सुजीतकुमार चं. तायडे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
रामटेक